खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला – मा.सोमनाथ गोडसे व्याख्यान

पुणे आवृत्ती
बातम्यांचा राजा
जनप्रवास
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध. RNI NO. MAHMAR/2013/57952

## छत्रपती संभाजी महाराज धगधगते अग्निकुंड : गोडसे

राजगुरुनगर
जनप्रवास : वार्ताहर





अवघ्या नऊ वर्षांच्या राज्यकारभारात मुघल, पोर्तुगीज, आदिलशहा, डच, इंग्रज, सिद्धी अशा अनेक शत्रूंना नामोहरण करून अजिंक्य योद्धा राहिलेले छत्रपती संभाजी महाराज म्हणजे निर्भीड, बाणेदार पराक्रमाचे धगधगते अग्नीकुंड होते, असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक सोमनाथ गोडसे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत छत्रपती संभाजी महाराज या विषयावर बोलत होते.

याप्रसंगी संस्था अध्यक्ष ड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के.आर. पाचारणे उपस्थित होते.

सोमनाथ गोडसे यांनी आपल्या व्याख्यानात छत्रपती संभाजी महाराजांचा जीवनपट उलगडून दाखवला. ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महानिर्वाणानंतर संभाजीराजांनी स्वराज्याची घडी विस्कटून न देता शेकडो लढाया जिंकून राज्यविस्तार केला. ते अत्यंत शूरवीर होते. रयतेचे कैवारी होते. राजकारणातील बारकावे आत्मसात केलेले कुशल राजकारणी होते. संभाजीराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांची प्रबळ इच्छाशक्ती आणि झुंजारपणाचे ठळक उदाहरण म्हणजे नाशिकजवळील रामशेज किल्ल्याचा लढा होता, असे ते म्हणाले.

संभाजीराजांनी वेगवेगळ्या राजवटींशी लढलेली लढाई ही धार्मिक नसून राजकीय असल्याने ते स्वराज्यरक्षकच होते असे ते म्हणाले. संभाजीराजे हे भाषाप्रभू व कवी होते. पोर्तुगीज, इंग्रजी, संस्कृत, हिंदी, फ्रेंच अशा आठ भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. बुधभूषणसारखा अद्वितीय ग्रंथ त्यांनी लिहिल्याचे गोडसे यांनी सांगितले.

संसदीय लोकशाहीत समभाव टिकवायचा असेल तर छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे यांच्या राज्यकारभाराचा आदर्श जपायला हवा असे ते म्हणाले. औरंगजेबाने संभाजीराजांना पकडल्यावर मराठा सरदारांकडून त्यांना सोडवण्याचा प्रयत्न का झाला नाही असा प्रश्न उपस्थित करून इतिहास संशोधनाची आवश्यकता व्यक्त केली.

विद्यार्थ्यांचे भविष्य हे मंत्रोच्चार, ज्योतिष, हस्तरेषा घडवू शकत नाहीत त्यासाठी महापुरुषांच्या विचारांचा ऐवज मनात जपून ठेवायला हवा. संभाजीराजांच्या इतिहासाची शिदोरी बरोबर घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षणाची लढाई लढावी व गड-किल्ल्यांचे संवर्धन, स्वच्छता ठेवावी असेही आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.धनंजय बोर्हाडे यांनी तर आभार हिरामण सातकर यांनी मानले.

पुढारी

# छत्रपती संभाजी महाराज धगधगते अग्निकुंड

## सोमनाथ गोडसे यांचे प्रतिपादनर; बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमाला

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

अवघ्या नऊ वर्षांच्या राज्यकारभारात मुघल, पोर्तुगीज, आदिलशहा, डच, इंग्रज, सिद्धी अशा अनेक शत्रूंना नामोहरण करून अजिंक्ययोद्धा राहिलेले छत्रपती संभाजी महाराज म्हणजे निर्भीड, बाणेदार पराक्रमाचे धगधगते अग्निकुंड होते, असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक सोमनाथ गोडसे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबराव बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'छत्रपती संभाजी महाराज' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के.आर.पाचारणे उपस्थित होते.

गोडसे यांनी व्याख्यानात छत्रपती संभाजी महाराजांचा जीवनपट उलगडून दाखवला. ते



बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना सोमनाथ गोडसे.

म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महानिर्वाणानंतर संभाजीराजांनी स्वराज्याची घडी विस्कटून न देता शेकडो लढाया जिंकून राज्यविस्तार केला. ते अत्यंत शूर तसेच रयतेचे कैवारी होते. राजकारणातील बारकावे आत्मसात केलेले कुशल राजकारणी होते. संभाजीराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांची प्रबळ इच्छाशक्ती आणि झुंजारपणाचे ठळक उदाहरण म्हणजे नाशिकजवळील रामशेज किल्ल्याचा लढा होता, असे ते म्हणाले.

संभाजीराजांनी वेगवेगळ्या राजवटींशी लढलेली लढाई ही धार्मिक नसून, राजकीय असल्याने ते स्वराज्यरक्षकच होते, असे गोडसे म्हणाले.

संभाजीराजे हे भाषाप्रभू व कवी होते. पोर्तुगीज, इंग्रजी, संस्कृत, हिंदी, फ्रेंच अशा आठ भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. 'बुधभूषण'सारखा अद्वितीय ग्रंथ त्यांनी लिहिल्याचे गोडसे यांनी सांगितले. औरंगजेबाने संभाजीराजांना पकडल्यावर मराठा सरदारांकडून त्यांना सोडवण्याचा प्रयत्न का झाला नाही, असा प्रश्न उपस्थित करून इतिहास संशोधनाची आवश्यकता व्यक्त केली.

विद्यार्थ्यांचे भविष्य हे मंत्रोच्चार, ज्योतिष, हस्तरेषा घडवू शकत नाहीत. त्यासाठी महापुरुषांच्या विचारांचा ऐवज मनात जपून ठेवायला हवा. संभाजीराजांच्या इतिहासाची शिदोरी बरोबर घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षणाची लढाई लढावी. गड-किल्ल्यांचे संवर्धन, स्वच्छता ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.सूत्रसंचालन प्रा.धनंजय बोऱ्हाडे, परिचय डॉ. पायल ओसवाल, हिरामण सातकर यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Feb 1, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

Date of Publication : बुधवार, दि. १ फेब्रुवारी २०२३ R.N.I. MAHN


गुड मॉर्निंग
प्रभात पुणे, बुधवार, दि. १ फेब्रुवारी २०२३ ४
खेड तालुका विशेष

# छत्रपती संभाजी महाराज स्वराज्यरक्षकच

## सोमनाथ गोडसे : वेगवेगळ्या राजवटींशी लढलेली लढाई राजकीयच

**राजगुरुनगर, दि. ३१ (प्रतिनिधी)** - अवघ्या नऊ वर्षांच्या राज्यकारभारात मुघल, पोर्तुगीज, आदिलशहा, डज, इंग्रज, सिद्धी अशा अनेक शत्रूंना नामोहरण करून अजिंक्य योद्धा राहिलेले छत्रपती संभाजी महाराज म्हणजे निर्भीड, बाणेदार पराक्रमाचे धगधगते अग्नीकुंड होते. संभाजी महाराजांनी वेगवेगळ्या राजवटींशी लढलेली लढाई ही धार्मिक नसून राजकीय असल्याने ते स्वराज्यरक्षकच होते असे असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक सोमनाथ गोडसे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत छत्रपती संभाजी महाराज या विषयावर बोलत होते. सोमनाथ गोडसे यांनी आपल्या



**सोमनाथ गोडसे**

व्याख्यानात छत्रपती संभाजी महाराजांचा जीवनपट उलगडून दाखवला.

ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महानिर्वाणानंतर संभाजीराजांनी स्वराज्याची घडी विस्कटून न देता शेकडो लढाया जिंकून राज्यविस्तार केला. ते अत्यंत शूर वीर होते. रयतेचे कैवारी होते. राजकारणातील बारकावे आत्मसात केलेले कुशल राजकारणी होते. संभाजीराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांची प्रबळ इच्छाशक्ती आणि झुंजारपणाचे ठळक उदाहरण म्हणजे नाशिकजवळील रामशेज किल्ल्याचा लढा होता. संभाजीराजे हे भाषाप्रभू व कवी होते. पोर्तुगीज, इंग्रजी, संस्कृत, हिंदी, फ्रेंच अशा आठ भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. बुधभूषणसारखा अद्वितीय ग्रंथ त्यांनी लिहिल्याचे गोडसे यांनी सांगितले.

संसदीय लोकशाहीत समभाव टिकवायचा असेल तर छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे यांच्या राज्यकारभाराचा आदर्श जपायला हवा. औरंगजेबाने संभाजीराजांना पकडल्यावर मराठा सरदारांकडून त्यांना सोडवण्याचा प्रयत्न का झाला नाही, असा प्रश्न उपस्थित करून इतिहास संशोधनाची आवश्यकता व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी, परिचय डॉ. पायल ओसवाल यांनी तर हिरामण सातकर यांनी आभार मानले.

### महापुरुषांच्या विचारांचा ऐवज...

विद्यार्थ्यांचे भविष्य हे मंत्रोच्चार, ज्योतिष, हस्तरेषा घडवू शकत नाहीत त्यासाठी महापुरुषांच्या विचारांचा ऐवज मनात जपून ठेवायला हवा. संभाजीराजांच्या इतिहासाची शिदोरी बरोबर घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षणाची लढाई लढावी व गड-किल्ल्यांचे संवर्धन, स्वच्छता ठेवावी, असे आवाहन इतिहास अभ्यासक सोमनाथ गोडस केले.

केसरी
राष्ट्रीय ठेवा

# छत्रपती संभाजी महाराज धगधगते अग्निकुंड : सोमनाथ गोडसे

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** अवघ्या नऊ वर्षाच्या राज्यकारभारात मुघल, पोर्तुगीज, आदिलशहा, डज, इंग्रज, सिद्धी अशा अनेक शत्रूंना नामोहरण करून अजिंक्य योद्धा राहिलेले छत्रपती संभाजी महाराज म्हणजे निर्भीड, बाणेदार पराक्रमाचे धगधगते अग्नीकुंड होते, असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक सोमनाथ गोडसे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत छत्रपती संभाजी महाराज या विषयावर बोलत होते.

याप्रसंगी संस्था अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के.आर.पाचारणे उपस्थित होते.



सोमनाथ गोडसे यांनी आपल्या व्याख्यानात छत्रपती संभाजी महाराजांचा जीवनपट उलगडून दाखवला. ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महानिर्वाणानंतर संभाजीराजांनी स्वराज्याची घडी विस्कटू न देता शेकडो लढाया जिंकून राज्यविस्तार केला. ते अत्यंत शूरवीर होते. रयतेचे कैवारी होते. राजकारणातील बारकावे आत्मसात केलेले कुशल राजकारणी होते. संभाजीराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांची प्रबळ इच्छाशक्ती आणि झुंजारपणाचे ठळक उदाहरण म्हणजे नाशिक जवळील रामशेज किल्ल्याचा लढा होता, असे ते म्हणाले.

संभाजीराजांनी वेगवेगळ्या राजवटींशी लढलेली लढाई ही धार्मिक नसून राजकीय असल्याने ते स्वराज्यरक्षकच होते, असे ते म्हणाले. संभाजीराजे हे भाषाप्रभू व कवी होते. पोर्तुगीज, इंग्रजी, संस्कृत, हिंदी, फ्रेंच अशा आठ भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. बुधभूषणसारखा अद्वितीय ग्रंथ त्यांनी लिहिल्याचे गोडसे यांनी सांगितले. संसदीय लोकशाहीत समभाव टिकवायचा असेल, तर छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे यांच्या राज्यकारभाराचा आदर्श जपायला हवा, असे ते म्हणाले. औरंगजेबाने संभाजीराजांना पकडल्यावर मराठा सरदारांकडून त्यांना सोडवण्याचा प्रयत्न का झाला नाही, असा प्रश्न उपस्थित करून इतिहास संशोधनाची आवश्यकता व्यक्त केली.

रविवार दि. ५ फेब्रुवारी २०२३

**प्रादेशिक**

रविवार, दि. ०५ फेब्रुवारी २०२३ ४

# छत्रपती संभाजी महाराज धगधगते अग्निकुंड : सोमनाथ गोडसे



राजगुरुनगर (किरण खुडे): (स. गांवकरी)

अवघ्या नऊ वर्षाच्या राज्यकारभारात मुघल, पोर्तुगीज, आदिलशहा, डच, इंग्रज, सिद्धी अशा अनेक शत्रूंना नामोहरण करून अजिंक्य योद्धा राहिलेले छत्रपती संभाजी महाराज म्हणजे निर्भीड, बाणेदार पराक्रमाचे धगधगते अग्नीकुंड होते, असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक सोमनाथ गोडसे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत छत्रपती संभाजी महाराज या विषयावर बोलत होते. याप्रसंगी संस्था अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के.आर.पाचारणे उपस्थित होते.

सोमनाथ गोडसे यांनी आपल्या व्याख्यानात छत्रपती संभाजी महाराजांचा जीवनपट उलगडून दाखवला. ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महानिर्वाणानंतर संभाजीराजांनी स्वराज्याची घडी विस्कटून न देता शेकडो लढाया जिंकून राज्यविस्तार केला. ते अत्यंत शूरवीर होते. रयतेचे कैवारी होते. राजकारणातील बारकावे आत्मसात केलेले कुशल राजकारणी होते. संभाजीराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांची प्रबळ इच्छाशक्ती आणि झुंजारपणाचे ठळक उदाहरण म्हणजे नाशिकजवळील रामशेज किल्ल्याचा लढा होता, असे ते म्हणाले. संभाजीराजांनी वेगवेगळ्या राजवटींशी लढलेली लढाई ही धार्मिक नसून राजकीय असल्याने ते स्वराज्यरक्षकच होते असे ते म्हणाले. संभाजीराजे हे भाषाप्रभू व कवी होते. पोर्तुगीज, इंग्रजी, संस्कृत, हिंदी, फ्रेंच अशा आठ भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. बुधभूषणसारखा अद्वितीय ग्रंथ त्यांनी लिहिल्याचे गोडसे यांनी सांगितले. संसदीय लोकशाहीत समभाव टिकवायचा असेल तर छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे यांच्या राज्यकारभाराचा आदर्श जपायला हवा असे ते म्हणाले. औरंगजेबाने संभाजीराजांना पकडल्यावर मराठा सरदारांकडून त्यांना सोडवण्याचा प्रयत्न का झाला नाही असा प्रश्न उपस्थित करून इतिहास संशोधनाची आवश्यकता व्यक्त केली.

विद्यार्थ्यांचे भविष्य हे मंत्रोच्चार, ज्योतिष, हस्तरेषा घडवू शकत नाहीत त्यासाठी महापुरुषांच्या विचारांचा ऐवज मनात जपून ठेवायला हवा. संभाजीराजांच्या इतिहासाची शिदोरी बरोबर घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षणाची लढाई लढावी व गड-किल्ल्यांचे संवर्धन, स्वच्छता ठेवावी असेही आवाहन त्यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा.धनंजय बोहाडे यांनी तर आभार हिरामण सातकर यांनी मानले.

HRM

लोकमत

# छत्रपती संभाजी महाराज धगधगते अग्निकुंड : गोडसे

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** 'अवघ्या नऊ वर्षांच्या राज्यकारभारात मुघल, पोर्तुगीज, आदिलशहा, डच, इंग्रज, सिद्धी अशा अनेक शत्रूंना नामोहरम करून अजिंक्य योद्धा राहिलेले छत्रपती संभाजी महाराज म्हणजे निर्भीड, बाणेदार पराक्रमाचे धगधगते अग्निकुंड होते,' असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक सोमनाथ गोडसे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबराव बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत छत्रपती संभाजी महाराज या विषयावर बोलत होते. याप्रसंगी संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.

सोमनाथ गोडसे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महानिर्वाणानंतर संभाजीराजांनी स्वराज्याची घडी विस्कटून न देता शेकडो लढाया जिंकून राज्यविस्तार केला. ते अत्यंत शूर वीर होते. रयतेचे कैवारी होते. राजकारणातील बारकावे आत्मसात केलेले कुशल राजकारणी होते. संभाजीराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांची प्रबळ इच्छाशक्ती आणि झुंजारपणाचे ठळक उदाहरण म्हणजे नाशिकजवळील रामशेज किल्ल्याचा लढा होता.

संभाजीराजे हे भाषाप्रभू व कवी होते. पोर्तुगीज, इंग्रजी, संस्कृत, हिंदी, फ्रेंच अशा आठ भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. बुधभूषणसारखा अद्वितीय ग्रंथ त्यांनी लिहिल्याचे गोडसे यांनी सांगितले. संसदीय लोकशाहीत समभाव टिकवायचा असेल तर छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे यांच्या राज्यकारभाराचा आदर्श जपायला हवा, असे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांचे भविष्य हे मंत्रोच्चार, ज्योतिष, हस्तरेषा घडवू शकत नाहीत, त्यासाठी महापुरुषांच्या विचारांचा ऐवज मनात जपून ठेवायला हवा. संभाजीराजांच्या इतिहासाची शिदोरी बरोबर घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षणाची लढाई लढावी व गड-किल्ल्यांचे संवर्धन, स्वच्छता ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी, परिचय डॉ. पायल ओसवाल यांनी तर आभार हिरामण सातकर यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 8 Feb 03, 2023
Powered by: erelego.com

# छत्रपती संभाजीमहाराज हे स्वराज्यरक्षकच : सोमनाथ गोडसे

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क



**राजगुरुनगर** : संभाजीराजांनी वेगवेगळ्या राजवटींशी लढलेली लढाई ही धार्मिक नसून राजकीय असल्याने ते स्वराज्यरक्षकच होते. अवघ्या नऊ वर्षांच्या राज्यकारभारात मुघल, पोर्तुगीज, आदिलशहा, डच, इंग्रज, सिद्धी अशा अनेक शत्रूंना नामोहरम करून अजिंक्य योद्धा राहिलेले छत्रपती संभाजीमहाराज म्हणजे निर्भीड, बाणेदार पराक्रमाचे धगधगते अग्निकुंड होते, असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक सोमनाथ गोडसे यांनी केले. ते येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'छत्रपती संभाजीमहाराज' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के. आर. पाचारणे यांच्यासह ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

सोमनाथ गोडसे यांनी आपल्या व्याख्यानात छत्रपती संभाजी महाराजांचा जीवनपट उलगडून दाखवला. ते म्हणाले, की छत्रपती शिवाजीमहाराजांच्या महानिर्वाणानंतर संभाजीराजांनी स्वराज्याची घडी विस्कटू न देता शेकडो लढाया जिंकून राज्यविस्तार केला. ते अत्यंत शूरवीर होते. रयतेचे कैवारी होते. राजकारणातील बारकावे आत्मसात केलेले कुशल राजकारणी होते. संभाजीराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांची प्रबळ इच्छाशक्ती आणि झुंजारपणाचे ठळक उदाहरण म्हणजे रामशेज किल्ल्याचा लढा होता.

संभाजीराजे हे भाषाप्रभू व कवी होते. त्यांचे आठ भाषांवर प्रभुत्व होते. संसदीय लोकशाहीत समभाव टिकवायचा असेल तर छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे यांच्या राज्यकारभाराचा आदर्श जपायला हवा. विद्यार्थ्यांचे भविष्य हे मंत्रोच्चार, ज्योतिष घडवू शकत नाही. त्यासाठी महापुरुषांच्या विचारांचा ऐवज मनात जपून ठेवायला हवा, असे गोडसे यांनी सांगितले.

प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पायल ओसवाल यांनी परिचय करून दिला, तर हिरामण सातकर यांनी आभार मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**

HRMI